ePaper

बारामतीत पवारांची 'पॉवर'; राहुरीमध्ये भाजपाचा 'अक्षय' विजय!

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवडमध्ये प्रदूषणावर धडक कारवाई

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 05 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पश्चिम बंगाल, आसाम, पदुचेरीत 'कमळ'; ममता दिदींना धक्का

# भाजपाचा दिग्विजय.!

महाईन्यूज । नवी दिल्ली

**पश्चिम बंगालसह देशातील पाच महत्त्वाच्या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले आहेत. या निकालांमध्ये पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजप 208 जागांच्या जवळ पोहोचल्याचे चित्र आहे. या प्रचंड यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाजपा मुख्यालयातून कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी बंगालच्या जनतेसाठी महत्वपूर्ण घोषणा केली असून, या निर्णयाचा फायदा राज्यातील लाखो लोकांना होणार असल्याचे सांगितले.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, "बंगालच्या पावन भूमीवर नवीन सूर्योदय झाला आहे. ही अशी पहाट आहे ज्याची अनेक पिढ्यांनी वाट पाहिली होती. हा विजय केवळ आकडा नाही, तर हिंसा आणि भीतीच्या राजकारणाचा अंत आहे." ते पुढे म्हणाले की, आजपासून बंगालच्या भविष्याची नवीन यात्रा सुरू होत आहे, जी विकास, अटळ विश्वास आणि नव्या आशेने पुढे जाईल. भाजप सरकार दिवसरात्र जनतेसाठी काम करेल, असा विश्वास त्यांनी दिला. मोदींनी घोषणा केली की, "पहिल्याच कॅबिनेटमध्ये आयुष्मान भारत योजना बंगालमध्ये लागू करण्यास मंजुरी दिली जाईल. तसेच घुसखोरांविरोधात कठोर कारवाई केली जाईल."

### मोदींच्या महत्त्वाच्या घोषणा

पहिल्याच कॅबिनेटमध्ये आयुष्मान भारत योजना बंगालमध्ये लागू करण्यास मंजुरी दिली जाईल.

घुसखोरांविरोधात कठोर कारवाई केली जाईल.



"२०२६ ची पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक कायम लक्षात ठेवली जाईल. जनशक्तिचा विजय झाला असून भाजपच्या सुशासनाच्या राजकारणाने बाजी मारली आहे. मी पश्चिम बंगालमधील प्रत्येक नागरिकासमोर नतमस्तक होतो. जनतेने भाजपला शानदार कौल दिला आहे आणि मी त्यांना खात्री देतो की, आमचा पक्ष पश्चिम बंगालमधील जनतेची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. आम्ही असे सरकार देऊ जे समाजातील सर्व घटकांना संधी आणि सन्मान सुनिश्चित करेल."

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान.

### 1 तमिळनाडूमध्ये विजय थलपतींचा चमत्कार



तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत तामिळ चित्रपटसृष्टीतील स्टार विजय थलपती यांनी जोरदार मुसंडी मारत मोठा राजकीय प्रभाव निर्माण केला आहे. त्यांच्या 'TVK' पक्षाने १०७ जागांवर आघाडी घेत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय घेतला. चित्रपटातील लोकप्रियतेप्रमाणेच जनतेने त्यांना भरभरून प्रतिसाद दिला. द्रविडी पक्षांच्या पारंपरिक अस्मितेला टक्कर देत सर्व घटकांना सामावून घेण्याच्या प्रयत्नांना यश मिळाले.

### 2 पुदुच्चेरीत पुन्हा 'रंगा'स्वामी



पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळवत सत्ता कायम राखली. 'एआयएनआरसी'सोबतच्या युतीत १२+४ अशा एकूण १६ जागांवर विजय मिळाला. विद्यमान मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांच्या साध्या, विश्वासार्ह प्रतिमेला मतदारांनी पसंती दिली. भाजपच्या संघटनात्मक ताकदीने आणि स्थानिक नेतृत्वाला मिळालेल्या राष्ट्रीय पाठबळामुळे हा विजय शक्य झाला.

### 3 केरळमध्ये काँग्रेस, भाजपाला पुन्हा हुलकावणी



केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'यूडीएफ'ने दणदणीत विजय मिळवत सत्ता काबीज केली. मात्र, भारतीय जनता पक्षाने तीन जागा जिंकून राज्यात आपली उपस्थिती दाखवली. तिरुवनंतपुरममधील नेमम, कळकूट्टम आणि चथानूर या मतदारसंघांत भाजपाला यश मिळाले. डाव्या पक्षांचे पारंपरिक वर्चस्व असलेल्या या राज्यात आता सत्तांतर झाल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत.

### 4 आसाममध्ये पुन्हा 'हिमंता' पर्व!



आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपाने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवत हॅटट्रिक केली. १२६ पैकी ८२ जागांवर विजय मिळवत पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवले. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा प्रभाव अधिक मजबूत झाला आहे. २०१४ नंतर सुरू झालेला भाजपाचा विस्तार २०१६ आणि २०२१ प्रमाणेच यंदाही कायम राहिला, ज्यामुळे राज्यात पुन्हा एकदा भाजपचे वर्चस्व अधोरेखित झाले.

| एकूण निवडणूक झालेली राज्ये | एकूण विधानसमा जागा (5 राज्ये मिळून) | भाजप / एनडीए आघाडीचा मोठा विजय | जनतेची पसंती विकास, सुशासन आणि स्थिरतेला | ही निवडणूक भारतीय राजकारणातील नव्या पर्वाची सुरुवात! |
|---|---|---|---|---|
| 5 | 637 | | | |

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा विक्रमी विजय

## पोटनिवडणुकीत महायुतीला मोठे यश; देशातील सर्वाधिक मताधिक्याचा विक्रम

**महाईन्यूज | बारामती**

**उत्तरप्रदेशातील साहिबाबाद मतदार संघातून २०२२ साली विजयी झालेल्या सुनील कुमार शर्मा यांच्या नावे २ लाख १४ हजार ८३५ एवढ्या विक्रमी मताधिक्याची नोंद देशात होती. ती मोडीत काढत २ लाख १८ हजार ९३० मतांनी बारामती विधानसभा पोटनिवडणूकीत महायुतीच्या उमेदवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विजय मिळविला.**



बारामतीच्या पोटनिवडणूकीत मतांचा विक्रम प्रस्थापित करावा असे आवाहन खुद्द मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीत प्रचार सांगता सभेत केले होते. बारामतीकरांनी ते मनावर घेत देशातील सर्व विक्रम मोडीत काढत नवा विक्रम प्रस्थापित केला.

बारामतीच्या पोटनिवडणूकीसाठी ५८.१७ टक्के मतदान झाले होते. एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदारांपैकी २ लाख २३ हजार ७०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. सोमवारी (दि. ४) बारामती एमआयडीसीतील राज्य वखार महामंडळाच्या गोदामात सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. पहिल्या फेरीपासूनच पवार यांनी त्यात प्रचंड आघाडी घेतली. फेरीनिहाय त्यांची आघाडी वाढतच गेली.

१८ व्या फेरीतच त्यांनी २०१९ साली अजितदादांनी येथे प्रस्थापित केलेला १ लाख ६५ हजार २६५ मतांचा विक्रम मोडला. त्यानंतरच्या पुढील प्रत्येक फेरीत त्यांचे मताधिक्य वाढतच गेले. २० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या पंचवार्षिक निवडणूकीत बारामतीत ७१.२७ टक्के मतदान झाले होते. पवार विरुद्ध पवार अशी लढत झाली होती. त्यावेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अजितदादा पवार यांना ईव्हीएम व पोस्टल अशी १ लाख ८१ हजार १३२ तर युगेंद्र पवार यांना ८० हजार २३३ मते मिळाली होती. १ लाख ९०९ मतांनी अजितदादा पवार विजयी झाले होते. अजितदादा यांच्या अकाली निधनानंतर लागलेली पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला. परंतु अपक्ष व काही छोट्या पक्षांमुळे तो असफल ठरला. सुनेत्रा पवार यांच्या विरोधात २२ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले. परंतु त्या सर्वांचे डिपॉझिट जप्त झाले.

### ही तर केवळ नव्या बारामतीची सुरुवात

आजचा हा निकाल जाहीर होत असताना दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया, अशी विनंती सुनेत्रा पवार यांनी केली आहे. आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते. आजचा हा निकाल जाहीर होत असताना आदरणीय दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया. दादांच्या स्वप्नातील बारामती घडवण्याची संधी मला दिल्याबद्दल मी सर्व बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानते. हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे. निर्धाराची, संघर्षाची आणि नव्या बारामतीची!

---

# 'ज्या ठिकाणी घटना घडली, त्याच ठिकाणी त्याला ठेचून मारलं पाहिजे'

**महाईन्यूज | नसरापूर**

**महाराष्ट्र दिनी घडलेल्या बालिकेच्या हत्येनंतर संपूर्ण परिसर हादरला असताना, आरोपी भिमराव कांबळे (वय ६५, रा. साळवडे) याच्या कुटुंबीयांनीच त्याच्यावर तीव्र संताप व्यक्त करत कठोर शिक्षेची मागणी केली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत आरोपीची पत्नी आणि मुलाने त्याच्याशी गेल्या १० वर्षांपासून कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले.**



आरोपीच्या पत्नीने अत्यंत भावनिक प्रतिक्रिया देताना, "ज्या ठिकाणी घटना घडली, त्याच ठिकाणी त्याला ठेचून मारलं पाहिजे," असे म्हणत संताप व्यक्त केला. "मला ११ नातवंडं आहेत. त्या चिमुरडीच्या कुटुंबीयांना काय वेदना होत असतील, याची कल्पनाही करवत नाही. मी स्वतः आई आहे," असे सांगताना त्या ढसाढसा रडल्या. गेल्या १० वर्षांपासून आरोपी घरापासून दूर असून त्याच्याशी कोणताही संपर्क नसल्याचे त्यांनी सांगितले.

"तो बाहेर काय करायचा, याची आम्हाला काहीच माहिती नव्हती. घरात मात्र त्याने मुलींशी गैरवर्तन केले नाही," असा दावा त्यांनी केला. मात्र, त्याच्यावर पूर्वी झालेले काही आरोप माहिती असल्याचेही त्यांनी मान्य केले.

दरम्यान, आरोपीच्या मुलानेही वडिलांच्या कृत्याचा तीव्र निषेध करत कठोर शब्दांत संताप व्यक्त केला. "तो माझा बाप आहे हीच माझी चूक आहे. त्याला लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्या," अशी मागणी त्याने केली. "त्या चिमुरडीला जितक्या वेदना झाल्या, तशाच वेदना त्यालाही झाल्या पाहिजेत," असेही तो म्हणाला.

### कुटुंबातही अत्याचार केल्याच्या घटना

"पूर्वीही त्याने कुटुंबातील सदस्यांवर अत्याचार केल्याच्या घटना घडल्या होत्या. तेव्हा आम्हाला घर सोडून जावे लागले. त्यानंतर आमचा त्याच्याशी काहीही संबंध राहिला नाही." कुटुंबीयांना दोष देऊ नये, अशी विनंतीही त्याने केली. या प्रकरणानंतर पोलिसांनी आरोपीच्या घरावर नोटीस लावून पुढील तपास सुरू केला असून, परिसरात संतापाचे वातावरण कायम आहे. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी एकमुखी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये प्रदूषणावर धडक कारवाई

## धूळ प्रदूषणावर लगाम घालण्यासाठी महापालिकेची धडक मोहीम; ४ आरएमसी प्रकल्प सील

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्रकल्पांवर विशेष तपासणी मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांविरोधात कारवाई करण्यात येत असून, धूळ प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला जात आहे.**



महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने पुनावळे, मोशी आणि पिंपळे सौदागर परिसरातील 10 आरएमसी प्रकल्पांची पाहणी केली. तपासणीदरम्यान 4 प्रकल्पांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत नसणे, परिसरात स्वच्छतेचा अभाव, तसेच कच्चा माल उघड्यावर साठविण्यात येत असल्याने धूळ प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले. याअनुषंगाने मोशी येथील दोन आणि चिंचवड, पिंपळे सौदागर येथील प्रत्येकी एक प्रकल्पांना सील लावण्यात आले आहे.

दरम्यान, इतर प्रकल्पांना धूळ नियंत्रणासाठीच्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नियमांचे पालन न केल्यास पुढील टप्प्यात अधिक कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. शहरातील आरएमसी प्रकल्पांसह बांधकाम आणि औद्योगिक प्रकल्पांवर महापालिकेकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. पर्यावरण विभागाकडून प्रदूषण नियंत्रणासाठी अशा तपासणी मोहिमा पुढेही सुरू राहणार आहेत. शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नियमांचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर पुढील काळातही कठोर कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### या पुढे कठोर कारवाई करणार

प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ नियम बनविणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आरएमसी प्रकल्पांमध्ये आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाययोजना न आढळल्यास तात्काळ कारवाई करण्यात येत आहे. पुढील काळातही तपासणी मोहीम अधिक तीव्र करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

### धडक कारवाई सुरूच

प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ नियम नव्हे तर त्यांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचे स्पष्ट करत महापालिकेने नियमभंग करणाऱ्या आरएमसी प्रकल्पांवर थेट सीलची कारवाई सुरू केली आहे. पुढील काळात तपासणी मोहीम अधिक तीव्र करून धूळ प्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये बालगुन्ह्यांचे धक्कादायक वास्तव; आरोपी ओळखीचेच

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नसरापूर येथील चिमुरडीच्या हत्याकांडानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर 'पुढारी'ने पिंपरी-चिंचवड शहरातील तत्सम घटनांचा आढावा घेतला असता एक धक्कादायक बाब समोर आली आहे. मागील वर्षात घडलेल्या चिमुरड्यांवरील अत्याचार, अपहरण आणि हत्यांच्या अनेक प्रकरणांत आरोपी हे ओळखीचे, शेजारी किंवा नातेवाईकच असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे बालकांसाठी धोका हा केवळ बाहेरील नव्हे, तर परिचित वर्तुळातूनच निर्माण होत असल्याचे वास्तव अधोरेखित झाले आहे.**

वाकड परिसरात घराजवळ सायकल खेळत असलेल्या आठ वर्षीय मुलाचे अपहरण करून त्याचा खून करण्यात आला होता. मृतदेह निर्जन स्थळी फेकून देण्यात आला. तपासात आरोपी परिसरात परिचित असल्याने मुलाने त्याच्यावर विश्वास ठेवला, अशी माहिती समोर आली.

पिंपरीतील सात वर्षीय धनश्री पुणेकर हिच्या अपहरण व हत्येच्या प्रकरणातही संशयाची सुई शेजारी राहणाऱ्या व्यक्तीकडे वळली. घराबाहेर खेळत असताना तिला फूस लावून नेण्यात आले. चार दिवसांनंतर तिचा मृतदेह सापडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

चिखली येथील आठ वर्षीय लक्ष्मण देवासी याच्या अपहरण आणि हत्येच्या प्रकरणात आरोपीने खंडणीच्या उद्देशाने मुलाला नेले. मात्र, मुलगा रडू लागल्याने भीतीपोटी त्याचा खून केल्याचे तपासात स्पष्ट झाले. आरोपी हा परिसरातीलच असल्याने मुलाने विरोध केला नाही, असे पोलिसांचे निरीक्षण आहे.



> लहान मुलांवरील गुन्ह्यांमध्ये अनेकदा आरोपी हे पीडितांच्या ओळखीतील असल्याचे तपासात दिसून येते. त्यामुळे पालकांनी मुलांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे, तसेच कोणतीही संशयास्पद बाब तात्काळ पोलिसांच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. पोलिसांकडून जनजागृती आणि प्रतिबंधक उपाययोजनांवरही भर दिला जात आहे.
>
> **- बसवराज तेली, अपर पोलिस आयुक्त, पिंपरी- चिंचवड.**

### नातेसंबंधांतील विश्वासघात

भोसरी परिसरात घडलेल्या घटनेत वडिलांकडूनच मुलींवर अत्याचार झाल्याचे समोर आल्यानंतर आईने दोन मुली व एका मुलाचा गळा आवळून खून केला आणि त्यानंतर आत्महत्या केली. या घटनेत 28 वर्षीय आईसह तीन चिमुरड्यांचा मृत्यू झाला.

सांगवी परिसरात अडीच वर्षांच्या चिमुरडीवरील अत्याचार आणि हत्येच्या प्रकरणात आरोपी सख्खा चुलताच निघाला. या घटनेने नातेसंबंधांवरील विश्वास हादरवला.

देहूरोड परिसरात सावत्र बापाने तीन वर्षांच्या मुलीला मारहाण करून ठार मारल्याची घटना देखील घरच्यांकडून होणाऱ्या अत्याचाराचे गंभीर स्वरूप दाखवणारी ठरली.

उर्से येथे शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने चॉकलेटचे आमिष दाखवून पाच वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून खून केल्याची घटना उघडकीस आली होती. आरोपीने कबुली दिल्यानंतर पोलिसही चक्रावले होते.

### प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज

पोलीस यंत्रणा सक्रिय; प्रतिबंधक उपायांची गरज शहर पोलिसांनी या सर्व प्रकरणांत तत्काळ कारवाई करून आरोपींना अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि विशेष पथकांच्या मदतीने गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला. मात्र, यापुढे अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करण्याची गरज व्यक्त होत आहे.



## भूमिका

**पुणे जिल्ह्यातील नसरापूर आणि म्हाळुंगे येथे घडलेल्या चिमुकल्यांवरील अत्याचार व हत्यांच्या घटना समाजमनाला सुन्न करणाऱ्या आणि अस्वस्थ करणाऱ्या आहेत. निष्पाप बालकांवर एवढ्या क्रूरतेने अत्याचार करून त्यांची हत्या केली जाणे ही केवळ कायद्याची नाही, तर संपूर्ण समाजाच्या नैतिकतेचीही मोठी शोकांतिका आहे.**

# बदलापूर ते नसरापूर



अशा घटना समोर आल्या की संताप उसळतो, निषेध होतो, कडक शिक्षा देण्याच्या मागण्या होतात; मात्र काही दिवसांनंतर पुन्हा सर्व काही पूर्ववत होत असल्याचे दिसते, ही अधिक चिंताजनक बाब आहे. नसरापूर येथील घटनेत आरोपीने चिमुरडीला फसवून गोठ्यात नेले, तिच्यावर अत्याचार केला आणि नंतर निर्घृण हत्या केली. विशेष म्हणजे, या आरोपीवर यापूर्वीही गुन्हे दाखल होते, तरीही तो जामिनावर बाहेर होता. ही बाब न्यायव्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवणारी आहे.

म्हाळुंगे येथील घटनेतही अल्पवयीन मुलानेच दुसऱ्या मुलावर अत्याचार करून त्याचा जीव घेतला. हे प्रकार समाजातील वाढत्या विकृतीचे आणि मानसिक असंतुलनाचे द्योतक आहेत. दरवेळी अशा घटना घडल्यावर पोलिस तत्परतेने आरोपींना अटक करतात, सरकारकडून 'फास्ट ट्रॅक' न्यायालयांत खटले चालवण्याची घोषणा होते. काही वेळा 'एन्काउंटर'सारख्या कठोर कारवायाही केल्या जातात; परंतु या उपायांनी दीर्घकालीन प्रतिबंध निर्माण होत नाही. गुन्हेगारांना त्वरित आणि कठोर शिक्षा मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच महत्त्वाचे म्हणजे गुन्हे होण्याआधीच त्यांना रोखणे. लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी 'पोक्सो'सारखा कडक कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यात विशेष न्यायालये, बालमैत्रीपूर्ण प्रक्रिया आणि गोपनीयतेचे संरक्षण यावर भर देण्यात आला आहे; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक त्रुटी दिसून येतात.

खटल्यांचा विलंब, पुराव्यांची कमतरता आणि तपासातील त्रुटी यामुळे अनेक आरोपी शिक्षा टाळतात, हे वास्तव नाकारता येत नाही. यंत्रणांवर दोष टाकणे सोपे असले तरी समाजाची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. आजच्या काळात मुलांच्या सुरक्षिततेबाबत पालक, शाळा आणि समाज यांना अधिक सजग राहणे गरजेचे आहे. मुलांना 'गुड टच-बॅड टच'सारख्या मूलभूत गोष्टींचे शिक्षण देणे, अनोळखी व्यक्तींशी सावध राहण्याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. तसेच, समाजमाध्यमांवर पसरत असलेल्या विकृत आणि हिंसक सामग्रीवर नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज आहे. याशिवाय, स्थानिक पातळीवर सुरक्षा उपाययोजना मजबूत करणेही महत्त्वाचे आहे. शाळा परिसरात 'सीसीटीव्ही' बसवणे, पोलिस गस्त वाढवणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे यांसारख्या उपाययोजना सातत्याने राबवणे आवश्यक आहे.

घटना घडल्यानंतर तात्पुरते उपाय करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक धोरणे राबवली गेली पाहिजेत. एकूणच, अशा अमानवी घटनांना आळा घालण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत; तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी, जलद न्यायप्रक्रिया, कठोर शिक्षा आणि समाजाची सामूहिक सजगता अत्यावश्यक आहे. प्रत्येक बालक सुरक्षित राहावे, ही केवळ शासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. जर आपण सर्वांनी मिळून ही जबाबदारी पार पाडली, तरच अशा घटनांवर काही प्रमाणात तरी नियंत्रण मिळवता येईल.

## प्रासंगिक »

### कुणाला कमी समजू नये

**प्रयाग येथे एक विद्वान पण साधा पंडित राहत होता. एकदा नेपाळचे राजे सामान्य वेशात तेथे आले. त्यांनी काही पंडितांकडे जाऊन विनंती केली, "माझ्या आजोबांचे पिंडदान करून द्या.**

माझ्याकडे पैसे नाहीत, फक्त थोडे लाडू दक्षिणा म्हणून आहेत." पैशाच्या हव्यासाने आंधळे झालेल्या अनेक पंडितांनी त्यांना नकार दिला.

शेवटी ते एका दयाळू पंडिताकडे गेले. त्याने राजांची अवस्था पाहून लगेच होकार दिला. "दक्षिणा महत्त्वाची नाही, विधी महत्त्वाचा," असे तो म्हणाला. त्याने पूर्ण श्रद्धेने पिंडदान करून दिले. राजे आनंदी झाले. त्यांनी पंडिताला लाडूंचे गाठोडे देत सांगितले, "हे घरी जाऊन उघडा."

पंडित घरी गेला. जेवताना त्याला गाठोड्याची आठवण झाली. त्याने ते उघडले आणि आश्चर्यचकित झाला—त्यात वीस सोन्याचे लाडू होते! त्याला कळले की साध्या वेशातील तो मनुष्य खरेतर नेपाळचा राजा होता.

- तात्पर्य : **माणसाचे मूल्य त्याच्या वेशावरून ठरवू नये. कुणालाही कमी समजू नये; खरा मानवीपणा नेहमी मोठा ठरतो.**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेले यश हे केवळ राजकीय विजय नसून, बदलत्या मतदारवृत्तीचे स्पष्ट संकेत देणारे ठरते.

# बंगालमध्ये बदलाची लाट; भाजपाचा उदय आणि तृणमूलची घसरण




दीर्घकाळ सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला या निवडणुकीत मोठा धक्का बसला, तर भाजपाने प्रभावी रणनीती, मुद्देसूद प्रचार आणि विविध मतदारवर्गांपर्यंत पोहोचत सत्ता स्थापनेच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकले.

या निकालामागे अनेक घटक कार्यरत होते. सर्वप्रथम, महिला मतदारांचा वाढता कल भाजपाच्या बाजूने झुकल्याचे दिसून आले. महिला सुरक्षा, आरक्षण यांसारख्या मुद्द्यांवर पक्षाने सातत्याने लक्ष केंद्रित करत आपली भूमिका स्पष्ट केली. यामुळे पारंपरिक मतपेढीत झालेली घसरण तृणमूलसाठी निर्णायक ठरली. दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे सरकारी कर्मचारी आणि नोकरीच्या प्रतीक्षेत असलेला तरुण वर्ग. प्रलंबित वेतन आयोग, रोजगाराच्या संधी आणि प्रशासकीय सुधारणा यांसारख्या मुद्द्यांवर भाजपाने दिलेली आश्वासने या वर्गाला भावली. सत्ताविरोधी नाराजीही या मतदारांमध्ये प्रकर्षाने जाणवली.

तिसरा मुद्दा म्हणजे तरुण मतदारांची भूमिका. विकास, पायाभूत सुविधा आणि डिजिटल माध्यमांवरील प्रभावी प्रचारामुळे भाजपाने तरुणांमध्ये आपली पकड मजबूत केली. सोशल मीडियाचा योजनाबद्ध वापर हा या निवडणुकीतील निर्णायक घटक ठरला. याशिवाय, सत्ताविरोधी लाट आणि कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवरून उभा राहिलेला जनतेचा रोष भाजपाच्या पथ्यावर पडला. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि काही घटनांमुळे निर्माण झालेली असंतोषाची भावना यामुळे मतदारांनी बदलाचा पर्याय स्वीकारला.

शेवटी, मतदार याद्यांच्या फेरतपासणीमुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढल्याचा दावा करण्यात आला, ज्याचा अप्रत्यक्ष फायदा भाजपाला झाला. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे भाजपाचा विजय आणि तृणमूल काँग्रेसचा पराभव. एकंदरीत, पश्चिम बंगालमधील हा निकाल हा केवळ एका पक्षाचा विजय नसून, बदलत्या राजकीय समीकरणांचा आणि मतदारांच्या अपेक्षांतील परिवर्तनाचा आरसा आहे. भविष्यात कोणताही पक्ष सत्तेत असो, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि विश्वास टिकवणे हेच खरे आव्हान ठरणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



निंदा स्तुती करवी पोट ।
सोंग दाखवी बोभाट ॥१॥

जटा राख विटंबना ।
धीर नाहीं क्षमा मना ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राहुरीत अक्षय कर्डिले यांचा सहज विजय

## इतर सर्व ६ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त; मतदान केंद्राबाहेर गुलाल उधळून जल्लोष

**महाईन्यूज । अहिल्यानगर**

**राहुरी विधानसभेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीच्या मतमोजणीत भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजी कर्डिले १ लाख १२ हजार ५८७ इतक्या विक्रमी मतांनी विजयी झाले. इतर सर्व ६ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. विजय जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राबाहेर गुलाल उधळून जल्लोष केला.**



पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवार अक्षय कर्डिले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारले. मंत्री विखे यांनी अक्षय कर्डिले यांचा सत्कार केला. तसेच निवडणूक योग्य पद्धतीने हाताळल्याबद्दल प्रशासनालाही धन्यवाद दिले.

भाजपचे अक्षय कर्डिले यांना एकूण १ लाख ४० हजार ९३ मते मिळाली तर त्यांचे लगतचे प्रतिस्पर्धी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. एकूण ४१२ टपाली मतदान झाले. त्यातील २९ मते बाद झाली. कर्डिले यांना २८३ मते मिळाली.

वंचित बहुजन आघाडीचे संतोष शेळके यांना ५६९०, ठाकरे गटाचे बंडखोर रावसाहेब खेवरे यांना ७२९९, अपक्ष ॲड. अथर्व म्हसे ११४८, सूर्यभान उर्फ सुरेश लांबे १३६८, महेश हापसे यांना २०५१ तर नोटाला १६३२ मते मिळाली.

आज, सोमवारी सकाळी राहुरीमध्ये मतमोजणी प्रक्रियेस निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्या नेतृत्वाखाली मतमोजणी प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. प्रथम टपाली मतदान मोजण्यात आले. एकूण १४ टेबलवर ११० कर्मचारी मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आले होते. दुपारी १ वाजता निकाल जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र मोजणी प्रक्रिया रेंगाळल्याने तसेच मोजणी करताना बुथ क्रमांक १७ व १८ मधील मतदान यंत्र बंद पडल्याने व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची मोजणी करून दुपारी ३ वा. निकाल जाहीर करण्यात आला.

निवडणुकीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचबरोबर पालकमंत्री राधाकृष्ण विखे व माजी खासदार सुजय विखे यांनी पालकत्वाची भूमिका स्वीकारली. त्यातूनच मतदारांनी मोठा कौल दिला, त्याबद्दल त्यांचे आभार. मतदारांनी शिवाजी कर्डिले यांच्या कार्याला पसंती दिली आहे, असे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीने विजय

अक्षय कर्डिले यांच्या विजयाने आपल्याला मोठा आनंद झाला आहे. अशावेळी स्व. शिवाजी कर्डिले यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने, योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याच्या पद्धतीने तसेच सरकारच्या कामगिरीवर राहुरी मतदारसंघातील मतदारांनी शिक्कामोर्तब केले. माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे हा विजय सुकर झाला. त्याबद्दल त्यांना धन्यवाद. या विजयाचे सर्व श्रेय मुख्यमंत्री फडणवीस आहे यांना आहे. त्यांनी समन्वयाची भूमिका घेऊन निर्णय घेतले. त्याचा परिणाम विजयात झाला, अशी प्रतिक्रिया पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केली.

---

# बंगालला कुशासनातून बाहेर काढण्याचं काम जनतेने केलं, मोदींवर विश्वास दाखवला

**महाईन्यूज । मुंबई**

**पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षांपासून असलेली ममता बॅनर्जींची सत्ता उलथवून टाकत भाजपाने घवघवीत यश मिळवलं आहे. भाजपाने जे करुन दाखवलं आहे त्याचा अंदाज एक्झिट पोल्समध्ये व्यक्त करण्यात आला होता. १८० हून अधिक जागा मिळवत भारतीय जनता पार्टीने बंगालमध्ये सत्ता खेचून आणली आहे. यानंतर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे.**



आजचा दिवस हा सगळ्यांसाठी एक ऐतिहासिक दिवस आहे. मी बंगालमध्ये गेलो होतो तेव्हा मला पत्रकार परिषदेत तिथल्या एका पत्रकाराने विचारलं होतं की ममतादीदी म्हणतात भाजपा आणि त्यांचे नेते बंगालच्या बाहेरचे आहेत. बाहेरचे लोक मतं मागतात. पण खरा बंगालचा पक्ष कुठला ते ममतादीदींना दाखवून दिलं बंगालचा खरा पक्ष भाजपाच आहे. बंगालच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास दाखवला आणि बंगालमध्ये महापरिवर्तन करुन दाखवलं. ते इतकं आहे की दोन तृतीयांश संख्याबळ भाजपाला मिळते आहे. बंगाल, आसाम, पुद्दुचेरीमधला विजय मोदींवरच्या विश्वासाचा विजय आहे.

मोदींवरचा विश्वास जनतेने मतपेटीतून दाखवला आहे. आपले मास्टर स्ट्रॅटेजिस्ट आणि आधुनिक राजकारणातले चाणक्य अमित शाह यांनी ज्या प्रकारे योजना तयार केली आणि आपलं नेतृत्व काय आहे ते दाखवून दिलं. तसंच आपले राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीनजी, आपले नेते सुवेंदू अधिकारी यांच्यासह मी सगळ्यांचं अभिनंदन करतो. बंगलचा विजय हा केवळ एका राज्याचा विजय नाही. बंगालचा विजय हा भारतात होणारी घुसखोरी, भारतावर होणारे हल्ले यापासून भारताला वाचवणारा विजय आहे. ज्याप्रमाणे ममतादीदींचं सरकार बांगलादेशचे घुसखोर बंगालमध्ये आणायचं आणि भारतात त्यांचा मुक्त संचार करायचे, आमचा रोजगार ते लोक खायचे. तसंच भारताच्या एकतेला, अखंडतेला धोका निर्माण करायचे. बंगाल म्हणजे आवो जाओ घर तुम्हारा और पकाओ बिर्यानी तो मुर्गा हमारा असं शासन होतं.

भाजपाच्या कार्यकर्त्याला तुम्ही थांबवू शकत नाही हे दाखवणारा विजय आहे. आजचा विजय हा देशाच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे. आसामचा विजय अपेक्षित होताच. पण जेव्हापासून आसाममध्ये भाजपाचं सरकार आलं तेव्हापासून आसाम देशाचं ग्रोथ इंजिन झालं आहे. त्याप्रमाणेच बंगालही विकासाचं इंजिन म्हणून काम करताना दिसेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आजचा विजय उत्सव हा फक्त विजयाचा नाही, हा विजय भारताचा विजयोत्सव आहे.

### बंगालच्या लोकांनी कुशासनातून राज्याला बाहेर काढलं

आजही देशात जनतेला एकच गोष्ट माहीत आहे. ती गोष्ट म्हणजे मोदी है तो मुमकिन है. बंगालला कुशासनातून बाहेर काढण्याचं काम जनतेने केलं आहे. ३० वर्षे काँग्रेस, ३६ वर्षे कम्युनिस्ट आणि या दोघांपेक्षा खतरनाक म्हणजे ममतादीदींचं शासन. बंगाल देशातलं पहिलं औद्योगिक राज्य होतं. सात हजार इंडस्ट्री तिथून सोडून गेल्या. बंगालची अवस्था जंगलराज झाली होती. पण माननीय मोदींनी जे व्हिजन मांडलं, जो आशेचा किरण दाखवला त्यावर लोकांनी विश्वास दाखवला. जनतेला हा विश्वास बसला की बंगालचं परिवर्तन कुणी करु शकतं तर त्या व्यक्तीचं नाव नरेंद्र मोदी हेच आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# ‘थलपती’ने करून दाखवलं!

## विजयच्या टीव्हीके (TVK) पक्षाची १०० हून अधिक जागा जिंकत ऐतिहासिक मुसंडी

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता थलपती विजय आणि त्याचा पक्ष टीव्हीके यांनी मोठा विजय मिळवला आहे. पहिल्यांदाच निवडणुकीला सामोरे गेलेल्या विजयच्या पक्षाने १०० हून अधिक जागा जिंकल्या असून तो तामिळनाडूतला सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.**



### थलपती विजयने वेगळं काय केलं?

विजयच्या आधी चित्रपटसृष्टीतून राजकारणात पाऊल ठेवणाऱ्या नेत्यांपेक्षा विजयने वेगळी स्टॅटर्जी वापरल्याचे दिसून येते. रजनीकांत यांच्याप्रमाणे विजयने राजकारणात प्रवेश करण्यास अनाठाई वेळ लावला नाही. २०२४ मध्ये टीव्हीके स्थापना केल्यानंतर, विजयने तळागाळात संघटन वाढवण्यावर भर देण्यासाठी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला, आणि त्यानंतर आपली सर्व शक्ती ही २०२६ ची विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी झोकून दिली. २०२६ ची विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा अत्यंत धाडसी आणि जोखमीचा निर्णय विजयने घेतला.

तामिळनाडूमधील डीएमके आणि एआयएडीएमके या दोन पक्षांचे वर्चस्व संपुष्टात आणू शकेल अशा पक्षाची गेल्या अनेक वर्षांपासून प्रतिक्षा होत होती. या दोन पक्षांचे वर्चस्व संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक मोठ्या-मोठ्या दिग्गजांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा धुळीस मिळाल्या. इतकेच नाही तर राष्ट्रीय पक्षांनाही ते आतापर्यंत शक्य झालेले नाही.

पण अखेर करिष्मा करून दाखवणारा कोणीतरी तामिळनाडूच्या राजकारणात अवतरला. थलपती विजयने आपल्या चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकिर्दीला पूर्णविराम देऊन राजकारणात उडी घेतली. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत ‘तमिळगा वेत्री कळघम’ या त्याच्या पक्षाला १०० हून अधिक जागांवर आघाडी घेतली आहे. विजयने तीन मोठी आव्हनं थोपवत रजनीकांत, कमल हासन आणि विजयकांत यांना शक्य झालं नाही ते यशस्वीपणे करून दाखवले आहे.

गेल्या २५ वर्षांपासून सुपरस्टार रजनीकांत यांच्या राजकारणातील प्रवेशाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. त्यांच्या राजकारणातील प्रवेशाने मोठे बदल पाहायला मिळण्याची शक्यता होती. विशेष म्हणजे, रजनीकांत यांची लोकप्रियता आणि त्यांचा चाहतावर्ग टीव्हीकेचे प्रमुख विजय यांच्यापेक्षा कितीतरी पटीने मोठा होता. मात्र, प्रकृतीचे आणि कोरोना महामारीचा कारण देत रजनीकांत यांनी एकही निवडणूक न लढवता २०२० मध्ये राजकारणातून माघार घेतली. कमल हासन यांचा राजकीय पक्ष ‘मक्कल नीथी मय्यम’ (MNM) या पक्षाची २०१९ आणि २०२१ मध्ये चांगलीच चर्चा झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र या पक्षाचा प्रभाव काही शहरी भागांपुरता आणि बुद्धिजीवी मतदारांपुरताच मर्यादित राहिला. २०२६ मध्ये कमल हासन अधिकृतपणे या शर्यतीतून कधीचेच बाहेर पडले आहेत. त्यांनी स्वतः ही निवडणूक लढवण्याऐवजी डीएमके आघाडीसाठी स्टार प्रचारक म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला.

थलपती विजयच्या आधी राजकीय व्यवस्थेला खऱ्या अर्थाने विजयाकांत यांनीच धक्के दिल्याचे पाहायला मिळते. २००६ मध्ये त्यांच्या डीएमडीके पक्षाने ८ टक्के मते मिळवली होती, तर २०११ मध्ये एआयएडीएमके बरोबर (AIADMK) युती करून ते विरोधी पक्षनेते बनले होते. मात्र, सातत्याने बदलणाऱ्या आघाड्यांमध्ये ते ज्युनिअर पार्टनर बनल्याने डीएमडीकेचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला. ‘कॅप्टन’ या नावाने प्रसिद्ध असलेल्या विजयाकांत यांचे २०२३ मध्ये निधन झाले.

## इराणचा अमेरिकन युद्धनौकेवर क्षेपणास्त्र हल्ल्याचा दावा; अमेरिकेने दिलं स्पष्टीकरण

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिकेच्या नौदलाच्या एका जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न केला असता, इराणने त्यावर दोन क्षेपणास्त्रे डागली असल्याची माहिती इराणची सेमी-ऑफिशियल वृत्तसंस्था फार्सने दिली आहे.**



### अमेरिकन नौदल जहाजांना लक्ष्य

गेल्या काही महिन्यांमध्ये इराणकडून वारंवार या प्रदेशातील अनेक अमेरिकन नौदल जहाजांना लक्ष्य केल्याचा दावा करण्यात आला आहे. ज्यामध्ये मार्चमध्ये युएसएस अब्राहम लिंकन एअरक्राफ्ट कॅरिअरवर लक्ष्य करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र सेंटकॉमने एक्सवर एक निवेदन जारी करत हा दावा खोटा असल्याचे आणि क्षेपणास्त्र युद्धनौकेच्या जवळपासही आले नाहीत असे स्पष्ट केले होते.

“इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या नौदलाने दिलेला इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याने, अमेरिकन जहाजाला लक्ष्य करत क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले,” असे फार्स वृत्तसंस्थेने म्हटले .

स्थानिक सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या या वृत्तात असेही म्हटले होते की, “क्षेपणास्त्रे धडकल्याने हे जहाजाला आपला प्रवास पुढे सुरू ठेवता आला नाही आणि त्याला माघार घेत पळ काढावा लागला.”

दरम्यान होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इराणच्या नौदलाने अमेरिकन नौदलाच्या जहाजावर हल्ला केला नसल्याचे एका अमेरिकन अधिकाऱ्याने द जेरुसलेम पोस्टशी बोलताना सांगितले.

अमेरिकन सेंट्रल कमांडने (CENTCOM) सोमवारी दुपारी एक्सवर पोस्ट करत अमेरिकेच्या कोणत्याही जहाजाला लक्ष्य करण्यात आलेले नसल्याचे स्पष्ट केले आहे. अमेरिकन सैन्य सध्या प्रोजेक्ट फ्रीडमला पाठिंबा देत असून, इराणच्या बंदरांवरील सागरी नाकेबंदीची कडक अंमलबजावणी करत आहे, असेही सेंटकॉमने आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सशी संबंधित फार्स वृत्तसंस्थेने होर्मुझ सामुद्रधुनीच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या जास्क बंदराजवळ अमेरिकेच्या एका युद्धनौकेवर दोन क्षेपणास्त्रे डागल्याचा दावा केला होता. या हल्ल्यामुळे अमेरिकन जहाजाला आपला मार्ग बदलावा लागला आणि माघार घ्यावी लागल्याचे, या वृत्तात म्हटले होते. मात्र, अमेरिकेने दावा अधिकृतपणे फेटाळून लावला आहे. या परस्परविरोधी दाव्यांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कान्स २०२६मध्ये तारा सुतारियाचा ग्लोबल डेब्यू



बॉलिवूड अभिनेत्री तारा सुतारिया हिच्या करिअरमध्ये मोठा टप्पा येण्याची शक्यता आहे. रिपोर्ट्सनुसार, ती २०२६ मध्ये होणाऱ्या कान्स फिल्म फेस्टिवल मध्ये डेब्यू करणार आहे. हा तिच्यासाठी केवळ वैयक्तिक यशाचा क्षण नसून भारतीय सिनेसृष्टीसाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे. कान्स फिल्म फेस्टिवल हा जगातील सर्वात प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांपैकी एक मानला जातो. या मंचावर रेड कार्पेटवर चालणे हे प्रत्येक कलाकाराचे स्वप्न असते. येथे सहभागी होणाऱ्या कलाकारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळते आणि त्यांच्या प्रतिभेला जागतिक व्यासपीठ मिळते. तारा सध्या तिच्या आगामी 'टॉक्सिक' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये आधीपासूनच उत्सुकता आहे. आता तिच्या कान्स डेब्यूच्या बातमीमुळे या उत्साहात आणखी भर पडली आहे. विशेष म्हणजे, 'टॉक्सिक' प्रदर्शित होण्यापूर्वीच तारा या प्रतिष्ठित मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करताना दिसणार आहे. कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये सहभागी होणे म्हणजे केवळ ग्लॅमर आणि रेड कार्पेटपुरते मर्यादित नसते. येथे जागतिक स्तरावरील दिग्दर्शक, निर्माते आणि विविध ब्रँड्सशी संपर्क साधण्याची मोठी संधी मिळते. त्यामुळे कलाकारांसाठी नवीन प्रोजेक्ट्स आणि आंतरराष्ट्रीय कामाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. तज्ज्ञांच्या मते, तारा सुतारियासाठी हा टप्पा तिच्या करिअरला नवी दिशा देणारा ठरू शकतो. ती केवळ बॉलिवूडपुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करण्याच्या दिशेने पुढे जात आहे, असे संकेत या डेब्यूमधून मिळतात. अलीकडच्या काळात कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये भारतीय कलाकारांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळे तारा सुतारियाची निवड हा या ट्रेंडचा पुढचा टप्पा मानला जात आहे. जर ही बातमी अधिकृतरित्या निश्चित झाली, तर हा क्षण तारा आणि भारतासाठी अभिमानाचा ठरेल. एकूणच, 'टॉक्सिक' चित्रपटाच्या आधीच कान्ससारख्या मोठ्या मंचावर तारा सुतारियाचा डेब्यू होणे हे तिच्या करिअरसाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. तिच्या या नव्या प्रवासाकडे आता चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

# हुमा कुरेशी बॉयफ्रेंड अडकणार लग्नबंधनात?



बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशी वर्षी बॉयफ्रेंड रचित सिंहसोबत लग्नाच्या बेडीत अडकणार असल्याची चर्चा आहे. या दोघांच्या नात्याची गेल्या अनेक दिवसांपासून चित्रपटसृष्टीत चर्चा आहे. त्यांनी गुपचुप साखरपुडा केल्याच्या बातम्याही समोर आल्या आहेत. एका रिपोर्टनुसार, २०२६ च्या शेवटी हुमा कुरेशी आणि रचित सिंह लग्न करणार असल्याचं सांगितलं जात आहे. ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात ते लग्नाचं प्लॅनिंग करत आहेत. त्यांच्या घरी लग्नाच्या तयारीलाही सुरुवात झाली आहे. मात्र त्यांच्या दोघांच्या लग्नाची जय्यत तयारी सुरू असल्याचं म्हटलं जात आहे. हुमा कुरेशी मोजक्या पाहुण्यांच्या उपस्थितीत लग्न करणार असून सेलिब्रिटींसाठी ग्रँड रिसेप्शनचं आयोजन करणार आहे. हुमाने अद्याप या लग्नाच्या बातम्यांवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही किंवा लग्नाची तारीखही जाहीर केलेली नाही. दरम्यान, 'थामा' चित्रपटाच्या स्क्रीनिंग दरम्यान त्यांच्या साखरपुड्याच्या चर्चांना उधाण आले होते. सप्टेंबर २०२५ मध्ये अमेरिकेत रचित सिंहने हुमाला फिल्मी स्टाइलने प्रपोज केल्याच्याही चर्चा होत्या. सोनाक्षी सिन्हाच्या लग्नातही ते दोघे एकत्र होते. आता ते लवकरच लग्नाच्या बेडीत अडकणार आहेत. रचित सिंग हा मुंबईतील एक प्रसिद्ध ॲक्टिंग कोच आणि ट्रेनर आहे. त्याने रणवीर सिंग, विकी कौशल आणि तापसी पन्नू सारख्या अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींसोबत काम केले आहे. दरम्यान, हुमा कुरेशी 'टॉक्झिक' या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटात ती साऊथचा सुपरस्टार यश सोबत स्क्रीन शेअर करणार आहे. तिचा मागील 'सिंगल सलमा' चित्रपट ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रदर्शित झाला होता.




# अपूर्वा साकारणार नवी भूमिका

अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने 'रात्रीस खेळ चाले...' या मालिकेत साकारलेल्या शेवंताच्या भूमिकेला मोठी लोकप्रियता मिळाली. अलीकडेच ती विवाहबंधनात अडकली. ज्याचे फोटो देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यानंतर आता पुन्हा एकदा तिने कामाला सुरुवात केली आहे. 'पद्मिनी' या मायक्रोड्रामा हॉरर सीरिजची तिनं घोषणा केली. विशेष म्हणजे ही सीरिज 'एआय' आधारित असून त्याची प्रस्तुती अपूर्वानं केली आहे. अपूर्वाने शेअर केलेल्या पोस्टमध्ये तिचा एक वेगळा लूक पाहायला मिळत आहे. तिने सुंदर साडी नेसली आहे. गळ्यात दागिने घातले आहेत. नाकात नथ आहे, कपाळावर टिकली आणि केस बांधलेले आहेत. तिचा हा लूक लक्ष वेधून घेत आहे. अपूर्वा या लूकमध्ये अत्यंत सुंदर दिसत आहे. पोस्टरमध्ये अपूर्वाच्या मागे संपूर्ण अंधार दिसत असून पुढे एक कंदील पाहायला मिळत आहे. याबरोबरच, या पोस्टरवर "ती दिसते पण सगळ्यांना नाही," असेही लिहिले आहे. यात अपूर्वा पद्मिनी हे पात्र साकारणार असल्याचेही समोर आले आहे.

# राहुल गांधींनी भाजप प्रवेश केला, तर त्यांच्याशी लग्न करेन



प्रख्यात बॉलिवूड अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रनौत हिने सोशल मीडियावर तिच्याविषयी व्हायरल झालेल्या विचित्र चर्चांबाबत तोंड उघडलं आहे. ' राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला, तर मी त्यांच्याशी लग्न करेन' असं कंगना म्हणाल्याच्या निराधार चर्चा ऑनलाईन विश्वात रंगल्या होत्या. मात्र या अफवांमध्ये काहीही तथ्य नाही, असं कंगनाने इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून स्पष्ट केलं आहे. "जर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपमध्ये प्रवेश केला, तर आपण त्यांच्याशी विवाह करु" असं विधान आपण केल्याचा दावा करणाऱ्या व्हायरल बातम्यांचे खंडन अभिनेत्री-खासदार कंगना रनौत हिने केले आहे. अफवांवर तीव्र संताप व्यक्त करताना चुकीची माहिती पसरवणाऱ्यांना कंगनाने खडे बोल सुनावले आहेत. कंगनाने या बातम्या फेक न्यूज असल्याचं सांगत सोमवार ४ मे रोजी आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून वृत्त फेटाळून लावले. अशा अफवांच्या माध्यमातून राजकारणातील महिलांना ज्या प्रकारे लक्ष्य केले जाते, त्या पद्धतीवर तिने टीका केली.

# मोहम्मद सिराजने घडवला इतिहास!

## गुजरात टायटन्सच पहिलाच गोलंदाज ठरला

**महाईन्यूज । मुंबई**



**आयपीएल २०२६ स्पर्धेत रविवारी डबल हेडर सामन्यांचा थरार पार पडला. स्पर्धेतील ४६ वा सामना गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात पंजाब किंग्जचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला होता. प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्जने २० षटकात ९ गडी बाद १६३ धावा केल्या.**

या धावांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सकडून वॉशिंग्टन सुंदरने शेवटच्या चेंडूवर षटकार मारून गुजरात टायटन्सला विजय मिळवून दिला. हा सामना गुजरातने ४ गडी राखून आपल्या नावावर केला. यादरम्यान गुजरातचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

या सामन्यात गोलंदाजी करताना मोहम्मद सिराजने दमदार कामगिरी केली. सिराजने ४ षटकात २८ धावा खर्च केल्या आणि १ गडी बाद केले. या दमदार कामगिरसह सिराजने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. सिराजने गोलंदाजी करताना सुरुवातीच्या षटकातच २ फलंदाजांना माघारी धाडलं. यासह मोहम्मद सिराज हा आयपीएलच्या पहिल्याच षटकात २ गडी बाद करणारा गुजरात टायटन्सच पहिलाच गोलंदाज ठरला आहे.

पंजाब किंग्जची सलामी जोडी ही आयपीएल २०२६ स्पर्धेतील सर्वात स्फोटक फलंदाजांच्या जोडींपैकी एक आहे. पण सिराजने पहिल्याच षटकात गुजरातला यश मिळवून दिलं, त्यामुळे पंजाबचा संघ अडचणीत आला. सिराजने आधी सलामीवीर फलंदाज प्रियांश आर्यला बाद करत माघारी धाडलं. त्याला बाद करण्यासाठी निशांत संधूने झेल घेतला. त्यानंतर पुढच्याच चेंडूवर त्याने कुपर कॉनोलीला बाद करत माघारी धाडलं.




# बीसीसीआय ‘गर्लफ्रेंड कल्चर’वर कठोर कारवाई करणार

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएल स्पर्धेदरम्यान अनेक खेळाडू आपल्या गर्लफ्रेंड्सबरोबर एकत्र प्रवास करताना दिसतात. इतकंच नव्हे तर टीम हॉटेलमध्येही एकत्र असतात. पण आता बीसीसीआय यावर देखील कडक निर्बंध घालणार असल्याची माहिती समोर आली आहे. आयपीएलदरम्यान खेळाडूंना आता गर्लफ्रेंडबरोबर फिरण्याबाबत बीसीसीआय लवकरच नवी नियमावली जाहीर करणार आहे.**





भ्रष्टाचाराची प्रकरणे टाळण्यासाठी हा निर्णय घेतला जाऊ शकतो. काही क्रिकेटपटूंच्या जोडीदार बेटिंग ॲप्ससाठी काम करत असल्याची माहिती समोर आली आहे, ज्यामुळे बीसीसीआयच्या भुवया उंचावल्या आहेत. पुढील आयपीएलपूर्वी, स्पर्धेदरम्यान क्रिकेटपटूंचं राहण्याचं ठिकाण, प्रवास आणि त्यांच्या गर्लफ्रेंड्ससोबतच्या भेटीगाठींबाबत काही नियम निश्चित केले जातील.

रिपोर्ट्सनुसार, या विषयावर बीसीसीआयच्या पुढील बैठकीत चर्चा केली जाईल. २०२४-२५ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर क्रिकेट बोर्डाने विदेश दौऱ्यांवरील पत्नी आणि कुटुंबियांसंदर्भात नियम तयार केले आहेत. मात्र, आयपीएलसाठी असे कोणतेही नियम नाहीत. या लीगमध्ये खेळाडूंच्या प्रवासाची जबाबदारी फ्रँचायझींची असते. आतापर्यंत बीसीसीआयने यासंदर्भात कोणतेही नियम जारी केलेले नाहीत. पण आता मात्र बीसीसीआय ॲक्शन मोडमध्ये आहे.

रिपोर्ट्समध्ये बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याच्या हवाल्याने म्हटले आहे की, पूर्वी आयपीएल दरम्यान खेळाडूंसोबत त्यांच्या प्रेयसींना हॉटेलमध्ये राहण्याची परवानगी नव्हती. मात्र, अलीकडे असं दिसून आलं आहे की अनेक खेळाडू त्यांच्या प्रेयसींसोबत प्रवास करतात आणि एकत्र राहतात. करप्शन युनिट विभागाच्या एका अधिकाऱ्याने असा दावा केला आहे की, पत्नी आणि अधिकृतपणे नोंदणीकृत प्रेयसींना एकत्र राहण्याची परवानगी आहे, परंतु याबाबत कोणतेही नियम नाहीत.

अनेक तरुण भारतीय क्रिकेटपटूंच्या प्रेयसी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आहेत. त्या त्यांच्या पेजवर विविध उत्पादने आणि कंपन्यांचा प्रचार करतात. यापैकी काही उत्पादने, जसे की बेटिंग ॲप्स, मद्य ब्रँड्स इत्यादी, बीसीसीआयच्या नियमांनुसार नाहीत. यामुळे एक चुकीचा संदेशही जातो. भारतीय संघात खेळणारा किंवा खेळण्याची इच्छा असणारा कोणताही क्रिकेटपटू अशा परिस्थितीत सापडू नये, अशी बीसीसीआयची इच्छा आहे. असंही दिसून आलं आहे की, खेळाडू आपल्या प्रेयसींना भेटण्यासाठी काही फ्रँचायझींच्या बसेस थांबवल्या जातात, यामुळे शिस्तीचा भंगही होतो.

आयपीएल २०२६ दरम्यान, हार्दिक पांड्या महिका शर्मासोबत, अर्शदीप सिंग समरीन कौरसोबत, यशस्वी जैस्वाल मॅडी हॅमिल्टनसोबत आणि ईशान किशन अदिती हुंडियासोबत प्रवास करताना दिसले होते. या हंगामात इतर अनेक क्रिकेटपटूदेखील त्यांच्या गर्लफ्रेंड्ससोबत दिसले आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
दि. 05 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# उन्हाचा तडाखा; तलावांवर गर्दी...

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया असलेल्या जनगणना २०२७ प्रक्रियेला शहरात सुरुवात झाली असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून नागरिक तसेच शासकीय व खासगी कर्मचाऱ्यांना या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

मे महिन्यात उन्हाची तीवता वाढल्याने शाळकरी मुले, महिला, नागरिकांची कडाक्याच्या उन्हापासून आराम मिळण्यासाठी तसेच ‘थंडा थंडा-कुल कुल’ राहण्यासाठी जलतरण तलावांकडे धाव घेत आहेत. पोहणे हा केवळ एक व्यायाम नसून, उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्याचा एक उत्तम उपाय मानला जात आहे. मे महिन्यात तापमानाचा पारा एक्केचाळीसवर गेल्यामुळे पिंपरी शहरातील कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलावांवर सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी पोहणाऱ्यांची मोठी गर्दी होत आहे.

सध्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी असल्याने लहान मुले आणि तरुण पोहण्याचा आनंद लुटत आहेत.

### तलाव ठरतोय दिलासा...

कडाक्याच्या उन्हामुळे नागरिक जलतरण तलावांकडे मोठ्या प्रमाणात वळत असून, पोहण्याद्वारे उष्णतेपासून दिलासा मिळवत आहेत. स्वच्छता, सुरक्षितता आणि आवश्यक सुविधा उपलब्ध असल्याने तलाव हा उन्हाळ्यातील सर्वोत्तम पर्याय ठरत आहे.

त्यामुळे पिंपरीतील नेहरुनगर येथील कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलावाकडे मफथंडाथंडा कुलकुल, उष्णतेपासून आराम मिळावा यासाठी शाळकरी मुले, तरुणाची संख्या सध्या वाढत चालली आहे. या गर्दीला आवर घालण्यासाठी जलतरण तलावांवर अनुभवी जीवरक्षक तैनात करण्यात आले आहेत.

सुरक्षेचे कडक नियम लागू केले आहेत. या जलतरण तलावाकडे स्वच्छतेची काळजी, पाण्याचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी आणि स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लीनिंग आणि निर्जंतुकीकरण नियमित केले जाते. शहरातील वाढत्या तापमानात मनसोक्त पोहून उष्णतेवर मात करण्यासाठी जलतरण तलाव हा एक उत्तम पर्याय ठरत आहे. तलावात स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे, शॉवर रूम, पिण्याचे पाणी या सुविधा येथे आहेत, असे पोहोचण्यासाठी येणारे नागरिक सांगतात.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.




Follow us on
WhatsApp




CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-चिंचवडमधील वीज समस्या सुटणार!

## ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र : पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, देहूगाव येथे उपकेंद्र

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळमधील भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन वीज यंत्रणा सक्षम केली जाणार आहे. पुढील २० वर्षे डोळ्यासमोर ठेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. त्यानुसार पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, तीर्थक्षेत्र देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेतील विद्युत विषयक कामासंदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांनी महावितरणाच्या पुण्यातील मुख्य कार्यालयात आढावा बैठक घेतली. चालू असलेली कामे, प्रलंबित कामे आणि प्रस्तावित कामांचा खासदार बारणे यांनी आढावा घेतला. प्रादेशिक संचालक सुनील काकडे, गणेशखिंड विभागाचे अधीक्षक अभियंता सिंहजीराव गायकवाड, ग्रामीणचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, संजय नेते, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, शेखर मुरकुटे, केशव काळुमाळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, मामुर्डीतील उपकेंद्राचे मजबुतीकरण केले जाणार आहे. २२ केव्हीची भूमिगत वाहिनी टाकली जाणार आहे. थेरगाव, चिंचवड, रावेत, पिंपरी येथे उपकेंद्र कार्यान्वित केली जाणार आहेत. त्याअंतर्गत विविध कामे सुरु केली आहेत. देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. ताथवडे येथे अतिउच्चदाब नवीन उपकेंद्र मंजूर आहे. यशदाच्या जागेत हे अतिउच्चदाब हे उपकेंद्र सुरु होणार आहे. येथील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तळेगाव एमआयडीसीतील आंबीतील अतिउच्चदाब केंद्राची क्षमता वाढविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

खासदार बारणे म्हणाले, विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे विविध कामे हाती घेतली जाणार आहे. विद्युत विषयक कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी ठेवला जातो. त्यासाठी यंदा १७ कोटींचा निधी ठेवला आहे. प्रधानमंत्री सुर्यघर योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त लोकांपर्यंत जाऊन रुफटॉप सोलर बसवून द्यावेत. स्मार्ट मीटर बसविण्याबाबत जनजागृती करावी. त्यांच्या तक्रारींचे निराकरण करुन मीटर बसवावेत. सबस्टेशनसाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला जास्तीत-जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आत्तापर्यंत सर्वाधिक निधी महाराष्ट्राला मिळाला आहे.

### गहुंजेत नवीन अतिउच्चदाब केंद्र

मावळ लोकसभा मतदारसंघातील विद्युत कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून दरवर्षी मोठी निधी मंजूर करुन घेतला जातो. त्यातून विविध कामे केली आहेत. राजमाची गाव विद्युतीकरणासाठी एक कोटींचा निधी मंजूर आहे. वडेश्वर येथे नवीन उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. गहुंजे येथे नवीन अतिउच्चदाब केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे तळेगावातील अति उच्चदाब केंद्रावरील भार कमी होणार असून मावळ तालुक्यातील ग्राहकांना अंखडित वीज पुरवठा होण्यास फायदा होणार आहे. मिडेंवाडीतील अतिउच्चदाब केंद्रामुळे चाकण फेज टू या केंद्राचा भार कमी होऊन तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांना फायदा होईल. या केंद्राचे काम प्रगतीपथावर असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

### तळेगाव एमआयडीसीतील औद्योगिक ग्राहकांना सुरळित वीजपुरवठा

मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे, उर्से, अंबी, लोणावळा, पवनानगर येथे अति उच्चदाब केंद्र कार्यान्वित आहेत. लोणावळ्यात नांगराव येथे, तळेगाव दाभाडेतील अंबी, माळवाडी, मिंडेवाडी येथे लघुदाब व स्विचिंग उपकेंद्र कार्यान्वित आहे. यामुळे तळेगाव एमआयडीसी परिसरातील औद्योगिक ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा सुरु झाला आहे. भंडारा डोंगर येथे विद्युतीकरणाची एक कोटी ३९ लाखांची कामे पूर्ण केली असल्याचेही बारणे यांनी सांगितले.

## नोकरीचे आमिष दाखवून साडेसात लाखांची फसवणूक; महिलेवर गुन्हा दाखल

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**सरकारी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून दोन महिलांची ७ लाख ४५ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी रावेत पोलिसांनी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत. खुशी वसंतराव देशमुख (रा. शिवनगरी मंदिराजवळ, बिजली नगर, चिंचवड) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पीडित महिलेने रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, १५ जुलै २०२१ ते १६ जुलै २०२५ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला. आरोपी खुशी देशमुख हिने फिर्यादी महिलेला येरवडा जेल विभागात 'ज्युनिअर क्लार्क' या पदावर आणि फिर्यादीची मैत्रीण तृप्ती निलेश बैठणकर यांना 'सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर' (विक्रीकर निरीक्षक) या पदावर सरकारी नोकरी लावून देते, असे आमिष दाखवले. या दोन्ही महिलांचा विश्वास संपादन करून आरोपीने त्यांच्याकडून वेळोवेळी एकूण ७ लाख ४५ हजार ५०० रुपये उकळले. मात्र, बराच काळ उलटूनही नोकरी मिळाली नाही आणि दिलेले पैसेही परत न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले.

### रावेत पोलिसांत गुन्हा दाखल

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून रावेत पोलिसांनी दि. ३ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता खुशी देशमुख विरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१८ (४) आणि ३१६ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक टार्फे करत आहेत. सरकारी नोकरीचे आमिष दाखवून पैसे मागणाऱ्या लोकांपासून सावध राहावे आणि अशा प्रकारच्या प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नका; आमदार शंकर जगताप

## धर्मांतराच्या षडयंत्राविरोधात काळेवाडीत 'आक्रोश' मोर्चा; दोषींवर कठोर कारवाईसाठी जनसमुदाय रस्त्यावर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आमिषे दाखवून आणि अंधश्रद्धेचा प्रसार करून हिंदूंचे बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात रविवारी काळेवाडीत 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. 'काळेवाडी कन्वर्जन फाईल्स' मधील सत्य समोर आणून दोषींना शिक्षा व्हावी, या मागणीसाठी हजारो हिंदू बांधव आणि महिला या मोर्चात सहभागी झाल्या होत्या. "प्रशासनाने हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा पुढच्या परिणामांना सरकार जबाबदार असेल," असा इशारा आमदार शंकर जगताप यांनी यावेळी दिला.**



### मोर्चातील प्रमुख मागण्या

- बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्या मुख्य सूत्रधारांना तात्काळ अटक करा.
- अंधश्रद्धा पसरवणाऱ्या प्रार्थना स्थळांची चौकशी करून ती बंद करा.
- पिंपरी-चिंचवडमधील सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्यांवर मोक्कांतर्गत कारवाई करा.

काळेवाडीतील पंचनाथ चौक ते आबाजी नाणेकर चौक दरम्यान हा मोर्चा काढण्यात आला. या आक्रोश मोर्चात आमदार गोपीचंद पडळकर, आमदार उमा खापरे, ॲड. वर्षाताई डहाळे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक विनोद नढे, नगरसेविका नीता पाडाळे, कोमल काळे, सरचिटणीस वैशाली खाडये, चिंचवड-काळेवाडी मंडळ अध्यक्ष ॲड. हर्षद नढे, सामाजिक कार्यकर्ते काळूराम नढे तसेच विविध हिंदू सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोर्चाला संबोधित करताना आमदार जगताप म्हणाले की, "विज्ञानाच्या युगात प्रार्थना करून आजार बरे करण्याचे दावे करणे ही शुद्ध फसवणूक आहे. जर असे असते तर रुग्णालयांची गरजच उरली नसती. गरिबी आणि अज्ञानाचा फायदा घेऊन चाललेला हा धर्मांतराचा बाजार आम्ही पिंपरी-चिंचवडमध्ये चालू देणार नाही. महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून आरोपींना १० लाखांपर्यंत दंड आणि कठोर शिक्षा झालीच पाहिजे."

यावेळी आमदार जगताप यांनी नागरिकांना आवाहन केले की, "आपल्या शेजारी काय घडतेय याकडे डोळेझाक करू नका. असे संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ प्रशासनाला किंवा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना कळवा," असे आवाहन जगताप यांनी केले. तसेच, विधिमंडळात यावर चर्चा झाली असून मंत्र्यांनीही कारवाईचे निर्देश दिले असल्याचे त्यांनी नमूद केले.

गोपीचंद पडळकर म्हणाले, "महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याच्या माध्यमातून अशा प्रकारांना लगाम घालण्याची तरतूद करण्यात आली असली, तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे तितकेच आवश्यक आहे. केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रशासनाने अशा प्रवृत्तींच्या मुळाशी जाऊन त्यांना ठेचले पाहिजे. गरिबी आणि अगतिकतेचा फायदा घेऊन जर कोणी हिंदू समाजाला लक्ष्य करत असेल, तर आम्ही गप्प बसणार नाही. आजचा हा जनसमुदाय म्हणजे हिंदू समाजाच्या संतापाचा उद्रेक आहे. जर वेळीच कारवाई झाली नाही, तर हा आक्रोश संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल."

## पवना नदीकाठावर हातभट्टीचा अड्डा उध्वस्त; ८ हजार लिटर रसायन जप्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**




मावळ तालुक्यातील शिरगाव परिसरात पवना नदीकाठावर सुरू असलेला गावठी हातभट्टी दारू निर्मितीचा अड्डा पोलिसांनी उध्वस्त करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ८ हजार लिटर गुळमिश्रित कच्चे रसायन जप्त करण्यात आले असून याची अंदाजे किंमत २ लाख ८० हजार रुपये इतकी आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे शिरगाव गावाच्या हद्दीत पवना नदीच्या काठावर ही कारवाई करण्यात आली. यावेळी एक महिला आरोपी बेकायदेशीरपणे हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुळमिश्रित रसायन भिजवत असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकून अंदाजे ८,००० लिटर रसायन (प्रत्येकी ३५ लिटरच्या प्रमाणात) जप्त केले. मात्र कारवाईदरम्यान महिला आरोपी घटनास्थळावरून पसार झाली असून तिचा शोध सुरू आहे.

या प्रकरणी शिरगाव (परंदवडी) पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (क) (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा दि. ३ मे २०२६ रोजी रात्री १०.५१ वाजता नोंदवण्यात आला.

या कारवाईचा पुढील तपास पोलीस हवालदार गिरीगोसावी करीत असून फरार आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## ओवळे सरपंचपदी सोमनाथ इंगळे यांनी निवड!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**ओवळे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी श्री. सोमनाथभाऊ इंगळे यांची नुकतीच निवड झाली असून, या निवडीचे सर्वत्र स्वागत केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, शिवभक्त अजित शिंदे यांनी नवनिर्वाचित सरपंचांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**




### 'एकत्र येऊन गावचा विकास करूया'

"जे झाले ते विसरून आता आपल्याला पुढे जायचे आहे," असे म्हणत शिंदे यांनी भविष्यात सोमनाथभाऊंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे संकेत दिले. वैयक्तिक हेवेदावे बाजूला ठेवून, केवळ गावच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या सकारात्मक भूमिकेमुळे ओवळे गावातील राजकीय वातावरण निवळण्यास मदत होणार असून, विकासाला नवी गती मिळेल, अशी चर्चा आता ग्रामस्थांमध्ये रंगली आहे.

अजित शिंदे यांनी सोमनाथभाऊ इंगळे यांची भेट घेऊन त्यांना शाल आणि भेटवस्तू देऊन सन्मानित केले. यावेळी बोलताना त्यांनी सोमनाथभाऊंच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली गावचा चेहरामोहरा बदलेल, अशी आशा व्यक्त केली.

या भेटीदरम्यान अजित शिंदे यांनी एक महत्त्वपूर्ण आणि प्रांजळ मनोगत व्यक्त केले. एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी सांगितले की, "निवडणुकीच्या वेळी काही स्थानिक पुढाऱ्यांना विरोध करण्याचा नादात, सोमनाथभाऊंसारख्या एका चांगल्या व्यक्तिमत्त्वाला नकळत विरोध करावा लागला. त्याबद्दल मला मनापासून खेद वाटतो. जर माझ्या कोणत्याही कृतीमुळे सोमनाथभाऊंचे मन दुखावले असेल, तर मी दिलगिरी व्यक्त करतो."

# ‘पीएमआरडीए’ने संरचनात्मक आराखडा सहा महिन्यात तयार करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ‘पीएमआरडी’च्या २०२६-२७ च्या ४,६२८ कोटींच्या अर्थसंकल्पास मंजुरी



महाईन्यूज । पुणे

**पुणे महानगर विकास प्रदेश प्राधिकरणाने संरचनात्मक (स्ट्रक्चरल) आराखडा तयार करताना प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी. तसेच येत्या सहा महिन्यात हा आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच पीएमआरडीच्या २०२६-२०२७ च्या ४,६२८ कोटींच्या अर्थसंकल्पास मान्यता देण्यात आली.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सह्याद्री अतिथीगृहात झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे आदी उपस्थित होते. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कात्रज-येरवडा ट्वीन टनेलच्या कामासाठी स्वतंत्र विशेष उद्देश वहन संस्था निर्माण करावी. त्यासाठी पुणे महापालिकेने पुढाकार घ्यावा. तसेच पीएमआरडी व पुणे महापालिकेने संयुक्तपणे कार्यवाही करावी. तसेच पुणे महापालिकेमध्ये गेलेल्या २३ गावांचा विकास आराखडा तयार करावा. तत्पूर्वी तेथे प्रथम संरचनात्मक आराखडा तयार करावा, असेही त्यांनी सांगितले.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) १४ व्या वार्षिक सभेत २०२६-२०२७ चा ₹४,६२८.८५ कोटींचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला व त्यास मंजुरी देण्यात आली. नागरिकांना वेळेत आणि जलद गतीने सेवा देता यावी यासाठी जमीन विल्हेवाटीच्या दैनंदिन कामकाजाचे अधिकार थेट महानगर आयुक्तांना देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत मंजूर करण्यात आला.

या अर्थसंकल्पात ₹२,९१८.८१ कोटी इतका सर्वाधिक निधी अभियांत्रिकी विभाग (१ व २) साठी पायाभूत सुविधा आणि विकासकामांसाठी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे पुणे महानगर क्षेत्रातील रिंग रोड, मेट्रो प्रकल्प, रस्ते विकास, कात्रज-येरवडा ट्विन टनेल, लोणावळा स्कायवॉक या कामांना गती मिळणार आहे. तसेच जमीन व मालमत्ता विभागासाठी ₹९७०.७६ कोटींचा भांडवली खर्च नियोजित करण्यात आला आहे. यंदाचा अर्थसंकल्प ₹३.५५ कोटींच्या शिलकीचा आहे.

'पीएमआरडीए'चे २०२५-२६ चे सुधारित व २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक या सभेत मांडण्यात आले. २०२६-२७ साठी प्राधिकरणाची एकूण महसुली व भांडवली जमा ₹४,६२८.८५ कोटी अपेक्षित आहे. याच्या तुलनेत एकूण खर्च ₹४,६२५.३० कोटी असून, अर्थसंकल्प ₹३.५५ कोटी शिलकीचा आहे. प्राधिकरणाच्या अग्निशमन निधीसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली असून, २०२६-२७ मध्ये या निधीत ₹१००.०५ कोटी जमा होण्याचा अंदाज आहे. त्यापैकी ₹७१.०४ कोटी खर्च अपेक्षित असून ₹२९.०१ कोटी शिल्लक राहतील. प्राधिकरणाला सर्वाधिक महसूल जमीन व मालमत्ता विभागाकडून ₹१,६४७.६५ कोटी आणि विकास परवानगी विभागाकडून ₹८०५.४५ कोटी मिळण्याची अपेक्षा आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे (पीसीएनटीडीए) ११ जून २०२१ रोजी पीएमआरडीएमध्ये विलीनीकरण झाले होते. त्यानंतर मोकळे भूखंड, व्यापारी इमारती आणि निवासी मालमत्तांचे दायित्व पीएमआरडीएकडे आले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना विहित मुदतीत सेवा देणे आवश्यक असल्याने जमीन व मालमत्ता विभागाच्या प्रक्रियेत सुलभता आणणे गरजेचे होते. यापूर्वी नागरी सेवा प्रदान करण्याचे अंतिम अधिकार ‘विकास प्राधिकरण’ स्तरावर होते. मात्र, ‘जमीन विल्हेवाट विनियम, २०२३’ मधील नियम क्र. २७ अन्वये अनेक अधिकार थेट महानगर आयुक्तांना देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यामुळे भूखंड व गृहयोजनांचे वाटप, मालमत्तांचे हस्तांतरण, सबलीज मंजुरी, वारस नोंद, ना हरकत दाखला (एनओसी) देणे, मोकळ्या जागा तात्पुरत्या भाडेतत्त्वावर देणे, भाडेपट्ट्यानंतर ताबा देणे, फेरमोजणी करणे आदी कामे जलद गतीने होणार आहेत. तसेच ११/०६/२०२१ पासून आतापर्यंत वापरलेल्या अधिकारांना पूर्वलक्षी मान्यता देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी, वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे, सहआयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता, संचालक (विकास परवानगी) अविनाश पाटील, मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी, तसेच दोन्ही महापालिकाच्या स्थायी समिती अध्यक्ष आदि उपस्थित होते.




### अर्थसंकल्पाचा तपशील:

- 'पीएमआरडीए'च्या २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पात एकूण अपेक्षित जमा ₹४,६२८.८५ कोटी असून, एकूण खर्च ₹४,६२५.३० कोटी आहे. त्यामुळे ₹३.५५ कोटींचे शिलकी अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे.
- महसुली जमा ₹४,४२८.३५ कोटी असून, त्यात जमीन व मालमत्ता विभागाकडून ₹१,६४७.६५ कोटी व विकास परवानगी विभागाकडून ₹८०५.४५ कोटी अपेक्षित आहेत. लेखा व वित्त विभागाकडून ₹३६०.०३ कोटी आणि इतर स्रोतांतून ₹१,६१५.२२ कोटी जमा अपेक्षित आहे.
- भांडवली जमा ₹२००.५० कोटी असून, लोणावळा स्कायवॉक प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ₹१०० कोटी व केंद्र शासनाकडून ₹१०० कोटी अपेक्षित आहेत. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेतून ₹५० लाख मिळण्याचा अंदाज आहे.
- खर्चाच्या बाजूस, भांडवली खर्चाला प्राधान्य देण्यात आले असून तो ₹३,८९४.६७ कोटी आहे. अभियांत्रिकी विभागासाठी ₹२,९१८.८१ कोटी, जमीन व मालमत्ता विभागासाठी ₹९७०.७६ कोटी आणि इतर विभागांसाठी ₹५.१० कोटींची तरतूद आहे.
- महसुली खर्च ₹७३०.६३ कोटी असून, त्यात आस्थापना खर्च ₹४२.१६ कोटी, कंत्राटी मानधन ₹२५.८७ कोटी, प्रशासकीय खर्च ₹२२.९५ कोटी, इतर विभागांचा खर्च ₹४३९.६५ कोटी आणि इतर संस्थांना निधी वर्ग ₹२०० कोटी आहे.
- अग्निशमन दलासाठी ₹१००.०५ कोटी जमा अपेक्षित असून, त्यापैकी ₹६२ कोटी भांडवली व ₹९.०४ कोटी महसुली खर्चासाठी नियोजित आहेत. शिल्लक ₹२९.०१ कोटी राहतील.